**ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या " नदीच्या पात्रात बुडकी घेणे" या आकस्मिक उपाययोजना प्रशासकिय मान्यता देण्याच्या आर्थिकमर्यादा वाढ करणेबाबत. . . .**

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,**
**शासन निर्णय क्रमांक टंचाई-१४०२/प्र.क्र. १८०/पापु-१४**
**मंत्रालय , मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक :- ४ मार्च, २००३**

**संदर्भ** : १. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई ३०९९/प्र.क्र. १३/पापू-१४ दि. १ फेब्रुवारी १९९९.

२. शासन शुध्दीपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. टंचाई ३०९९/प्र.क.१३/पापू-१४ दि.१२.४.१९९९.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयानूसार राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या आकस्मिक योजनांबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या आकस्मिक उपाययोजनेमध्ये **" नदीच्या पात्रात बुडकी घेणे "** या उपाययोजनेचा समावेश आहे. संदर्भाधीन क्र. २ च्या शुध्दीपत्रकानुसार,जिल्हाधिका-यांना या उपाययोजनेला मंजूरी देण्यासाठी रु. १०००/- ची वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सदर वित्तीय मर्यादा ही फेब्रुवारी १९९५ मध्ये निश्चित केलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत कामाच्या खर्चात झालेली वाढ लक्षात घेता, रु. १०००/- च्या वित्तीय मर्यादेत बुडकी घेणे शक्य होत नसल्याने, सदर वित्तीय मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेऊन ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या **" नदीच्या पात्रात बुडकी घेणे "** या उपाययोजनेची **" रु -१०००/- "** ची वित्तीय मर्यादा या शासन निर्णयान्वये **" रु २४००/- "** पर्यत वाढविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या कामावरील खर्च शासनाकडून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांकरीता मागणी क्र. " सी-६ लेखाशिर्ष २२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०१- अवर्षण -१०२-

पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा १०२- पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा-४१- सहाय्यक अनुदाने १०२ (००) (०१) निकडीच्या पाणी पुरवठा योजना (२२४५००९३) (योजनेतर )" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणा-या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

४. हा शासन निर्णय महसुल व वन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१७९ /व्यय-३ दि. २०/२/२००३ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमुख )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद,
सर्व वरीष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद,
सर्व विभागीय उप संचालक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व विभागीय मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
वित्त विभाग व्यय-३/विनियम
सर्व मंत्रालयीन विभाग
विभागातील सर्व कार्यासने
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता) , महाराष्ट्र , मंबंई
महालेखापाल-२ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मंबंई
महालेखापाल-२ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, नागपूर
निवडनस्ती, पापू-१४.



५२८